


दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : २२९, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.०१ एप्रिल २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


# LPG संकटात नवीन सिलिंडर योजना !

## बुकिंग करण्याची गरज नाही, थेट जा आणि घरी घेऊन या...

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.३१, नवी दिल्ली :** इराण युद्धामुळे जागतिक कच्च्या तेलाच्या पुरवठ्यात गंभीर अडचणी निर्माण झाल्या आहेत. याचा भारतावर, विशेषतः एलपीजी पुरवठ्यावर प्रचंड प्रमाणात परिणाम झाला आहे. भारत आपल्या एलपीजी गरजेपैकी सुमारे ६०% आयात करतो, ज्यापैकी ९०% होर्मुझच्या सामुद्रधुनीतून येतो. मात्र, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून होणाऱ्या जलवाहतुकीत व्यत्यय आल्यानं पुरवठा विस्कळीत झाला आहे. यामुळे देशभरातील अनेक शहरांमध्ये एलपीजीचा तुटवडा निर्माण झाला असून, गॅस एजन्सींबाहेर लांबच लांब रांगा दिसत आहेत.

**५ किलोचा छोटा सिलिंडर**

दरम्यान, सरकारी तेल विपणन कंपनी आणि इंडियन ऑइल कॉर्पोरेशननं एलपीजी सिलिंडर मिळवण्यासाठी एक सोपा उपाय सांगितला आहे. कंपनीच्या म्हणण्यानुसार, त्यांचा ५ किलोचा छोटा सिलिंडर सहज उपलब्ध आहे. यासाठी बुकिंग करण्याची गरज नाही आणि तुम्हाला जास्त वेळ रांगेत ताटकळत थांबावं लागणार नाही. फक्त गॅस एजन्सीला भेट द्या आणि तो ५ किलोचा सिलिंडर कसा मिळेल याची



**लहान सिलिंडर, काम मोठं :**
- या सिलिंडरसाठी (छोटू) बुकिंगची आवश्यकता नाही.

इंडियन गॅस एजन्सीमध्ये ५ किलोचा फ्री ट्रेड एलपीजी सिलिंडर
- तुम्हाला सहजपणे उपलब्ध होईल.
- यासाठी पत्त्याचा पुरावा आवश्यक नाही, फक्त ओळखपत्र लागेल.
- हे किराणा दुकाने आणि अधिकृत आउटलेटमधूनही पुन्हा भरता येते.

माहिती जाणून घ्या.

**याचं वैशिष्ट्य काय आहे?**

'वाट न पाहता तत्काळ एलपीजी हवा आहे का? तर मग इंडियनच्या सिलिंडरला (छोटू) भेटा. इंडियनचा ५ किलोचा फ्री ट्रेड एलपीजी सिलिंडर तुमच्या जवळच्या कोणत्याही इंडियन गॅस एजन्सीमध्ये उपलब्ध आहे. सोयीस्कर आणि सहजपणे उपलब्ध होणारा हा सिलिंडर अशा वेळेसाठीच बनवला आहे.

जेव्हा तुम्हाला स्वयंपाकासाठी कुठलीही अडचण न यावी म्हणून, आकाराने लहान, पण सोयींच्या बाबतीत मोठा,' असं आयओसीने एका सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटलं आहे.

कंपनीचं म्हणणं आहे की, हा सिलिंडर (छोटू) 'फ्री ट्रेड एलपीजी' श्रेणीत येतो. यामुळे नेहमीच्या घरगुती एलपीजी कनेक्शन मिळवण्यासाठी येणारे आव्हानं दूर होतात आणि तो सहज उपलब्ध होतो. हा सिलिंडर खरेदी करण्यासाठी, तुम्हाला फक्त ओळखीचा पुरावा द्यावा लागेल. पत्त्याचा पुरावा आवश्यक नाही. शिवाय, यासाठी नेहमीच्या घरगुती एलपीजीसारखे नियम लागू नाहीत आणि ग्राहकांना रिफिलसाठी एकाच वितरकाकडे जाण्याची गरज नाही.

**तुम्हाला सिलिंडर कुठे भरु शकतात?**

याचा अर्थ असा की तुम्ही हा सिलिंडर कुठेही भरु करू शकतात. तो इंडियन वितरक, किराणा दुकाने आणि अधिकृत आउटलेट्सवर रिफिल म्हणजेच भरता येतो. बुकिंगची आवश्यकता नाही. फक्त दुकानात जा आणि तो भरून घ्या. कंपनीचं म्हणणं आहे की, हा सिलिंडर (छोटू) लोकांना एलपीजी सहज उपलब्ध करून देण्याच्या व्यापक प्रयत्नांचा एक भाग आहे.

# सोयगाव तालुक्यात बनोटी, जरंडी मंडळात अवकाळी सह गारपीट कांदा पिकांसह फळबागा, रब्बीचे नुकसान





**अक्षराज : पुनम परदेशी**

**दि.३१, सोयगाव :** सोयगाव सह तालुक्यात सोमवारी (ता.३०) सायंकाळी चार वाजेच्या सुमारास अवकाळी पावसासह वादळी वाऱ्याने हजेरी लावली दरम्यान बनोटी, जरंडी मंडळात गारपिटीसह वादळी वाऱ्याचा पाऊस झाल्याने बनोटी, वर ठाण, तिडका, अंजोला, वाकडी,जरंडी आणि धिंगापूर या ७ गावांम ध्ये गारपीट सह वादळी वाऱ्याचा जोरदार पाऊस झाला. यामुळे कांदा बी, पपई, फळबागा सह रब्बीचे मका, ज्वारी, गहू आदी पिके आडवी होऊन नुकसान झाले आहे. दरम्यान बनोटी, तिडका, वरठाण, अंजोला, वाकडी या गावांमध्ये अर्ध्या तासाच्या गारपिटीने आकांडतांडव केला अंजोला शिवारात गारपिटीने पपई, मका, गहू, ज्वारी आदी पिके उध्वस्त झाली असून धिंगापूर, जरंडी शिवारात वादळी वाऱ्यासह गारपिटीने पिकांचे नुकसान झाले आहे जरंडी, धिंगा पूर भागात एकाच आठवड्यात दोनवेळा गारपीट सह अवकाळी पाऊस झाला. त्यामुळे या भागात शेतकरी हवालदिल झाला आहे.

बनोटी मंडळातील बनोटी सह तिडका, वाकडी, अंजोला, वरठाण या ५ गावांना मोठा फटका बसला आहे. त्यामुळे तातडीने नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई मिळावी अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

# वैष्णवी चौकात मारहाणीची घटना; प्रेमसंबंधातून वाद चिघळला !

**अक्षराज : प्रमोद डफळ**

**दि.३१, राहुरी :** राहुरी तालुक्यातील देवळाली प्रवरा येथील फॅक्टरी परिसरातील वैष्णवी चौक येथे प्रेमसंबंधाच्या वादातून मारहाणीची घटना घडल्याने परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. स्थानिक पातळीवर मिळालेल्या माहितीनुसार, एका व्यापाऱ्याचा व एका महिलेचा वैयक्तिक संबंध असल्याची माहिती संबंधितांच्या कुटुंबीयांना समजताच हा वाद उफाळून आला आणि त्याचे रूपांतर थेट मारहाणीत झाले.

घटनास्थळी व्यापाऱ्याची पत्नी अचानक पोहोचताच तिने संबंधित महिलेला जाब विचारत संतापाच्या भरात मारहाण केल्याचे सांगितले जाते. हा प्रकार सुरू असतानाच संबंधित पुरुषाने तेथून पळ काढल्याची माहिती पुढे येत आहे. दरम्यान, घटनेची माहिती मिळताच त्या महिलेचा पतीही घटनास्थळी दाखल झाला. त्यानंतर दोन्ही बाजूंमध्ये जोरदार वाद होऊन परस्परांमध्ये धक्काबुक्की व मारहाणीचा प्रकार घडल्याचे प्रत्यक्षदर्शींनी सांगितले.

या घटनेमुळे काही काळ परिसरात तणावपूर्ण




वातावरण निर्माण झाले होते. नागरिकांची मोठी गर्दी घटनास्थळी जमल्याने परिस्थिती अधिक चिघळण्याची शक्यता निर्माण झाली होती. संबंधित व्यक्ती स्थानिक पातळीवर परिचित व सामाजिकदृष्ट्या प्रभावी मानल्या जात असल्याने या प्रकरणाबाबत विविध चर्चांना उधाण आले आहे. काहीजणांकडून या प्रकरणात वैयक्तिक संबंधांमुळे निर्माण झालेला वाद असल्याचे सांगितले जात असताना, तर काहींकडून नैतिकतेच्या मुद्द्यावरही चर्चा रंगताना दिसत आहे.

दरम्यान, या घटनेचे काही व्हिडिओ व छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल होण्याची शक्यता वर्तवली जात असून त्यामुळे प्रकरण आणखी चर्चेत येण्याची चिन्हे आहेत. घटनेवेळी काही कुटुंबीयही उपस्थित असल्याची माहिती समोर येत आहे, ज्यामुळे वाद अधिकच तीव्र झाल्याचे सांगितले जाते.

या प्रकरणात अद्याप कोणतीही अधिकृत तक्रार दाखल झाली आहे की नाही, याबाबत स्पष्ट माहिती मिळालेली नाही. मात्र, अशा प्रकारच्या घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ शकतो, त्यामुळे संबंधित यंत्रणांनी तातडीने दखल घेऊन योग्य ती कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

# पोलीस ठाणे वाढवणा (बु.) हद्दीत कॉपर वायर चोरी चोरीच्या ०५ प्रकरणांचा उलगडा



**अक्षराज : जयराम देमगुंडे**

**दि. ३१, उदगीर (लातुर) :** उदगीर तालुक्यातील पोलीस ठाणे वाढवणा (बु.) हद्दीत घडलेल्या कॉपर वायर चोरीच्या सलग घटनांचा उलगडा करण्यात पोलीस प्रशासनास महत्त्वपूर्ण यश प्राप्त झाले आहे. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या पाणबुडी मोटारींना जोडलेले कॉपर वायर चोरी करून मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान करून चोरी करणाऱ्या आंतरराजीय टोळीचा पर्दाफाश करण्यात आला असून या प्रकरणात एकूण पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी पोलीस ठाणे वाढवणा (बु.) येथे गुरनं ७८/२०२६ व ८०/२०२६ अन्वये कलम ३०३(२) भारतीय न्याय संहिता (BNS) अंतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. फिर्यादी बालाजी धनराज तरवडे (रा. वाढवणा बु.) व इतर शेतकऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, दिनांक २६/०३/२०२६ ते २७/०३/२०२६ दरम्यान मौजे एकुर्का रोड परिसरातील साठवण तलावाजवळील डी.पी.वरून सुमारे १०५० मीटर कॉपर वायर (किंमत ₹८४,०००/-) अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले होते. तसेच दुसऱ्या घटनेत डांगेवाडी परिसरातील साठवण तलावावरील डी. पी.वरून ४६१ मीटर कॉपर वायर (किंमत ₹३६,८८०/-) चोरीस गेले होते. अशा प्रकारे एकूण ₹ ७२,८८०/- किमतीचा मुद्देमाल चोरीस गेला होता.

या घटनांचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक, अमोल तांबे यांच्या निर्देशानुसार तसेच अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण व उपविभागीय पोलीस अधिकारी अहमदपूर अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस ठाणे वाढवणा (बु.) येथे विशेष तपास पथक गठीत करण्यात आले. तपासादरम्यान घटनास्थळांचे बारकाईने निरीक्षण, तांत्रिक विश्लेषण, परिसरातील सीसीटीव्ही फुटेजचा अभ्यास, तसेच गोपनीय माहितीदार सक्रिय करून आरोपींचा शोध घेण्याचे काम सुरू करण्यात आले होते. तपासादरम्यान मिळालेल्या खात्रीशीर माहितीच्या आधारे पोलीस पथकाने वाढवणा पाटी परिसरात सापळा रचून संशयितांना ताब्यात घेतले. सखोल चौकशीअंती आरोपींनी गुन्हा केल्याची कबुली दिली. अटक आरोपींची नावे पुढीलप्रमाणे

**१) रिहाईस जिवराज पवार (वय २४ वर्ष)**
**२) सुजेश नवाब पवार (वय २६वर्ष)**
**३) दुकीस मलबकस पवार (वय ३५ वर्ष)**
**४) सासन सार्जन पवार (वय २४ वर्ष)**
**५) बबू जिवराज पवार (वय २६ वर्ष)**

(सर्व रा. सुगवा ललतपुर, ता. रिटी, जि. कटनी, राज्य मध्यप्रदेश)

से असून आरोपींनी वाढवणा, अहमदपूर, जळकोट, उदगीर व कमलनगर (कर्नाटक राज्य) परिसरात अशाच प्रकारच्या चोरीच्या घटना केल्याची कबुली दिली आहे. चोरी केलेले वायर जाळून त्यातून तांबे वेगळे करून ते विक्रीसाठी वापरण्याची त्यांची पद्धत असल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अधिक तपासात असे निष्पन्न झाले आहे की सदरचे आरोपी हे गावाजवळील मोकळ्या जागेत वास्तव्य करून किंवा शेतात कामाच्या बहाण्याने येऊन रेकी करून अशा प्रकारच्या चोऱ्या करत होते. अटक आरोपींपैकी रिहाईस जिवराज पवार याच्याकडून सुमारे २३ किलो कॉपर वायर जप्त करण्यात आले आहे. तसेच आरोपींकडून रेडमी, विवो व आयक्यू कंपनीचे एकूण ४ मोबाईल फोन जप्त करण्यात आले आहे. याशिवाय आरोपींकडे सोन्यासारखे दिसणारे प्युअर गोल्ड ९९९ असा ठसा असलेले बनावट धातूचे बिस्कीट स्वरूपातील साहित्यही आढळून आले असून ते पितळ असल्याचे निष्पन्न झाले आहे. या माध्यमातून फसवणुकीचा गुन्हा झाला आहे का याचाही तपास सुरू आहे. तपासादरम्यान आरोपींनी चोरी केलेले तांबे काही भंगार विक्रेत्यांना विक्री केल्याची माहिती समोर आली असून त्याबाबत पुढील तपास सुरू आहे. तसेच आरोपींच्या इतर साथीदारांचा शोध व इतर गुन्ह्यांतील सहभागाबाबत सखोल तपास सुरू आहे.

ही संपूर्ण कारवाई वरिष्ठांचे मार्गदर्शनात पोलीस ठाणे वाढवणा (बु.) चे प्रभारी अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक सुनील गायकवाड यांच्या नेतृत्वातील पथकामधील तसेच तपासी अधिकारी तुकाराम बळदे, शिवप्रताप रंगवाळ,संजय दळवे , बालाजी आकेमोड, शिवाजी केंद्रे, गोरख कसबे, राजेश कंचे यांच्या पथकाने अत्यंत कौशल्याने पार पाडली आहे.

# अमृत २.० अंतर्गत पोंभुर्णा शहराला ४०.८४ कोटी रु. किंमतीच्या पाणीपुरवठा प्रकल्पाला मंजुरी

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.३१, चंद्रपूर :** केंद्र शासन पुरस्कृत अमृत २.० अभियानांतर्गत पोंभुर्णा नगरपंचायतीच्या महत्त्वाकांक्षी पाणीपुरवठा प्रकल्पास राज्य शासनाने प्रशासकीय म ान्यता दिली आहे. तब्बल रु. ४०.८४ कोटी खर्चाच्या या पाणीपुरवठा प्रकल्पामुळे पोंभुर्णा शहरातील नागरिकांच्या दीर्घकालीन पाणी समस्येवर प्रभावी तोडगा निघणार असून, शहराच्या पायाभूत विकासाला नवी चालना मिळणार आहे.

या महत्त्वपूर्ण प्रकल्पासाठी माजी मंत्री व आ. सुधीर मुनगंटीवार यांनी सातत्याने राज्य शासनाशी पत्रव्यवहार करत प्रभावी पाठपुरावा केला. त्यांच्या या सातत्यपूर्ण प्रयत्नांमुळेच हा प्रकल्प मंजूर होऊ शकला आहे. स्थानिक पातळीवरील गरजा ओळखून त्या शासनदरबारी प्रभावीपणे मांडण्याच्या त्यांच्या कार्यशैलीचा हा आणखी एक यशस्वी परिणाम मानला जात आहे.

नगरविकास विभागाने दि. ३० मार्च २०२६ रोजी यासंदर्भातील शासन निर्णय निर्गमित केला असून, या प्रकल्पासाठी केंद्र शासनाकडून ५०% (रु. २०.४२ कोटी), राज्य शासनाकडून ४५% (रु. १८.३७८ कोटी) आणि नगरपंचायतीकडून ५% (रु. २.०४२ कोटी) निधी उपलब्ध होणार आहे. या निधीच्या सुयोग्य वापरातून पोंभुर्णा शहरात आधुनिक, दीर्घकालीन आणि शाश्वत पाणीपुरवठा व्यवस्था उभारली जाणार आहे.

या प्रकल्पामध्ये पाणी उचल यंत्रणा (इनटेक वेल), जलशुद्धीकरण प्रकल्प (डब्ल्यूटीपी), साठवण टाक्या (ईएसआर), विस्तृत वितरण व्यवस्था, उच्च क्षमतेची पाईपलाईन, सौर ऊर्जा प्रकल्प तसेच कामांदरम्यान बाधित होणाऱ्या रस्त्यांचे पुनर्स्थापन यांसारख्या विविध मूलभूत सुविधांचा समावेश आहे. यामुळे केवळ पाणीपुरवठाच नव्हे तर शहराच्या एकूण पायाभूत सुविधांमध्येही दर्जात्मक सुधारणा होणार आहे. हा प्रकल्प १८ महिन्यांत पूर्ण करण्याचे नियोजन असून, पूर्णत्वानंतर नागरिकांना नियमित, स्वच्छ व पुरेसा पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे.

पोंभुर्णा शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देणे ही आमची प्राथमिकता आहे. पाणी ही जीवनावश्यक गरज असून, या प्रकल्पामुळे शहराच्या विकासाला गती मिळेल आणि नागरिकांचे जीवनमान उंचावेल. हा प्रकल्प केवळ पाणीपुरवठा योजना नसून पोंभुर्णा शहराच्या भविष्यातील प्रगतीचा मजबूत पाया आहे. असे मत या संदर्भात बोलताना आ सुधीर मुनगंटीवार यांनी व्यक्त केले आहे.

नवीन पाणीपुरवठा प्रकल्पाच्या मंजुरीमुळे पोंभुर्णा शहराच्या सर्वांगीण विकासाला नवी दिशा मिळणार असून, नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील मूलभूत अडचणी दूर होऊन त्यांचे जीवनमान उंचावण्यास म ोठी मदत होणार आहे. या प्रकल्पामुळे भविष्यातील वाढत्या लोकसंख्येचा विचार करून दीर्घकालीन पाणीपुरवठ्याची सक्षम व्यवस्था निर्माण होणार असल्याने हा निर्णय पोंभुर्णा शहरासाठी ऐतिहासिक ठरणार आहे.




## बिहारचे नवे वळण!

प्रदीर्घ काळ बिहारच्या मुख्यमंत्रिपदी राहिलेले नितीशकुमार यांची २० मार्च २०२६ रोजी राज्यसभेवर निवड झाली. सुमारे २० वर्षांच्या कार्यकाळानंतर ते आता राज्याच्या राजकारणातून केंद्रात जात आहेत. अर्थात, नव्या मुख्यमंत्र्यांचा शपथविधी होईपर्यंत नितीशकुमार हे काळजीवाहू मुख्यमंत्री म्हणून पदावर कायम राहणार आहेत. नितीशकुमार यांचा राज्यसभेतील प्रवेश म्हणजे बिहारच्या राजकारणातील 'नवे वळण' आहे. बिहारच्या राजकारणावर दीर्घ काळ प्रभाव टाकणारे 'नितीश युग' संपुष्टात येत असून, तेथे भाजपच्या नेतृत्वाखालील नवा अध्याय सुरू होत आहे. गेली जवळपास २० वर्षे भाजप दुय्यम स्थानावर होता, पण आता चित्र बदलते आहे.

हे चित्र अचानक बदललेले नाही. बिहारमध्ये बस्तान बसवण्यासाठी भाजपने अतिशय नेमकेपणाने प्रयत्न केले. बिहारमध्ये अनेक वर्षे समाजवादी मतदारांचा एक मोठा वर्ग आहे. त्या वर्गाला आकर्षित करण्यासाठी दिवंगत कर्पूरी ठाकूर यांना 'भारतरत्न' देण्यात आले. तर भाजपचे राष्ट्रीय अध्यक्षपद बिहारमधील तरुण नेते नितीन नवीन यांना देण्यात आले. नितीशकुमार यांची राष्ट्रीय पातळीवरील भूमिका वाढवण्याचा प्रयत्न या पार्श्वभूमीवर दिसतो. त्यांनी स्वतःला एक 'किंगमेकर' म्हणून उभे करण्याचा प्रयत्न केला आहे. लोकसभेत २४० सदस्य असलेल्या भाजपला जनता दल युनायटेडच्या १२ लोकसभा सदस्यांचा पाठिंबा आहे, हे येथे लक्षात ठेवायला हवे.

सन १९९०पासून बिहारचे राजकारण केवळ दोन व्यक्तींच्या भोवती फिरत आले आहे, लालूप्रसाद यादव आणि नितीशकुमार! १९९० ते २००५पर्यंत लालू किंवा त्यांची पत्नी राबडी देवी हे मुख्यमंत्री होते, तर २००५पासून मधला काही महिन्यांचा काळ सोडला तर नितीशकुमार मुख्यमंत्री आहेत. आपले पद कायम राखण्यासाठी नितीश यांनी भाजपप्रणित एनडीएपासून ते लालूप्रसाद यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलापर्यंत अशा दोन टोकांच्या शक्तींशी तडजोड केली. त्यामुळे त्यांना 'पलटूराम' म्हणूनही ओळखले जाते. मात्र, दोन दशकांचे हे पलटी मारण्याचे राजकारण आता संपुष्टात येताना दिसते. त्यांची राज्यसभेवर निवड झाली असली, तरी वरिष्ठ सभागृहाचे सदस्य म्हणून शपथ घेईपर्यंत ते मुख्यमंत्रिपदावर कायम राहतील अशी अपेक्षा आहे. ही शपथविधी प्रक्रिया नऊ एप्रिलनंतर होण्याची शक्यता आहे, कारण त्या दिवशी राज्यसभेचे विद्यमान सदस्य निवृत्त होत आहेत.

या घडामोडींमुळे बिहारच्या राजकीय पटलावर महत्त्वपूर्ण बदल होत असल्याचे संकेत मिळतात. आघाडीतील प्रमुख भागीदार असलेल्या भाजपलाच बिहारचे मुख्यमंत्रिपद मिळेल, अशी जोरदार चर्चा सध्या सुरू आहे; आणि या पदासाठी सम्राट चौधरी किंवा विजयकुमार सिन्हा यांचे नाव वारंवार व ठळकपणे घेतले जात आहे.

नितीशकुमार यांच्या राजकीय कारकिर्दीला या वर्षात एक मोठे आणि निर्णायक वळण मिळाले आहे. नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत राष्ट्रीय लोकशाही आघाडीने (एनडीए) दणदणीत विजय मिळवला. २४३ पैकी एनडीएला तब्बल २०२ जागा मिळाल्या, ज्यात भाजपने ८९, जेडीयूने ८५ आणि इतर मित्रपक्षांनी उर्वरित जागा पटकावल्या. महाआघाडी (आरजेडी, काँग्रेस इ.) फक्त ४०-४५ जागांवरच मर्यादित राहिली. तेजस्वी यादव यांच्या नेतृत्वाखालील महाआघाडीला अपेक्षित यश मिळाले नाही आणि नितीशकुमार यांनी २० वर्षांच्या सत्ताविरोधी लाटेला यशस्वीपणे तोंड दिले. निवडणुकीनंतर नितीशकुमार यांनी दहाव्यांदा मुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली; पण चारच महिन्यांत दिल्लीमधून चक्रे फिरली. ते राज्यसभा निवडणुकीसाठी उभे राहिले आणि त्यांनी मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा दिला. हा निर्णय बिहारच्या राजकीय इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

# एप्रिल फुल !!

आज १ एप्रिल आजचा दिवस संपूर्ण दिवस जगात एप्रिल फुल म्हणून साजरा केला जातो. फुल (fool) म्हणजे मूर्ख. या दिवशी लोक एकमेकांना मूर्ख बनवतात. आपणही या दिवशी कोणाला तरी मूर्ख बनवलेच असेल. दुसऱ्याला मूर्ख बनवून एप्रिल फुल करण्याचा आनंद यापण सगळ्यांनीच लुटला असेल. एप्रिल फुल या प्रथेची सुरवात कधी झाली हे निश्चितपणे सांगता येणार नाही. याबाबत अनेक कथा प्रचलित आहे त्यातल्या एका फ्रेंच कथेनुसार पंधराव्या शतकात फ्रान्समध्ये ज्युलियन कॅलेंडर वापरत होते त्या कॅलेंडरप्रमाणे नववर्षाची सुरवात २५ मार्च ते १ एप्रिल या आठवड्यात होत असे. या आठवड्यात सगळे लोक वसंत ऋतूचे स्वागत आणि १ एप्रिलला नववर्ष साजरे करीत असत. मात्र १५८२ सालापासून फ्रेंच लोकांनी ग्रेगरियन कॅलेंडर स्वीकारले. या कॅलेंडर नुसार १ जानेवारीपासून पासून नववर्षाचा प्रारंभ होतो. हा बदल तेथील ग्रामीण भागातील अशिक्षित लोकांना माहीत नव्हता ते १ एप्रिलाच नववर्ष साजरा करीत त्यामुळे या लोकांना तेथील उच्चभ्रू , सुशिक्षित लोक मूर्ख (fool) म्हणत. जे लोक १ एप्रिलला नववर्ष साजरा करीत त्यांना फ्रांसमध्ये एप्रिल फुल असे संबोधले जाई. अशा तऱ्हेने १ एप्रिलला एप्रिल फुल करण्याची प्रथा जगभर पसरली. फ्रेंच लोक भारतात आल्यानंतर भारतातही ही प्रथा सुरू झाली. १ एप्रिलला आपले मित्र, नातेवाईक यांना एप्रिल फुल करण्याची प्रथा आता चांगलीच रुजली आहे. काळानुसार बदल होत आता लोक फेसबुक, व्हाट्सएप, ट्विटर या सोशल मीडियांच्या माध्यमातून एकमेकांना एप्रिल फुल करीत आहेत. आपल्या मित्रांना, नातेवाईकांना एप्रिल फुल करून त्यातून मिळणारा आनंद हा क्षणिक असला तरी तो आजच्या धकाधकीच्या जीवनात मोलाचा आहे. दुसऱ्यांना एप्रिल फुल बनवताना प्रत्येकाने स्वतःमधील वाईट प्रवृत्तीलाही एप्रिल फुल बनवावे. दररोज उशिरा उठण्याच्या सवयीला लवकर उठून व्यायाम करून एप्रिल फुल करावे. दररोज मोबाईल वापराच्या सवयीला एप्रिल फुल करून एखादे छानसे पुस्तक वाचावे. सर्वांशी जिव्हाळ्याने वागून आपल्यातील अहंकाराला एप्रिल फुल करावे. गरजवंताला मदत करून स्वार्थाला एप्रिलफुल करावे. मोठेपणाला एप्रिलफुल करून लहान मुलांशी खेळावे. स्वतःच्या मी पणाला एप्रिलफुल करुन आम्ही बनून समाजात वावरल्यास एकमेकांविषयी असलेली कटुता कमी होईल आणि प्रत्येकाला जीवनाचा आनंद घेता येईल.

**– श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

# ओळख ज्याची त्याची; चांगली आणि वाईट!

प्रत्येक व्यक्तीची ओळख त्याच्या कर्माची, स्वभावाची, विचारांची, व्यवहाराची आणि वर्तनाची ठेवण असते. कोणी कष्टाळू, प्रामाणिक, सत्यवचनी, नेक, दिलदार, मोकळ्या मनाचे, प्रेमळ आणि दयाळू ह्या विशेषणांनी नावारूपाला आलेले असतात. यांच्या एकदम विरुद्ध टोकाला असणारे कोणी आळशी, कामचुकार, अप्रामाणिक, खोटारडे, संकुचित मनाचे, खुनशी, रागीट, कंजूस आणि रानटी स्वभावाचे म्हणून बदनाम झालेले असतात. घरात, कुटुंबात, समाजात, गावात आणि कार्यक्षेत्रात वावरताना प्रत्येक व्यक्तीला एका ठराविक ओळखीचे लेबल चिकटलेले असते. त्या लेबलवर कोणी चांगला तर कोणी वाईट म्हणून कायमचा स्टॅम्प मारला जातो. हा ओळखीचा शिक्का व्यक्तींच्या मरणापर्यंत आणि मरणानंतरही कायम राहतो.

संत, महात्मे, थोर समाजसुधारक, भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नेते, विचारवंत, देशहिताला प्राधान्य देणारे उद्योजक, लेखक, कवी, समाजप्रबोधक, शास्त्रज्ञ या सर्वांची ओळख ऐतिहासिक, लोकांचे हीत साधणारी आणि अजरामर ठरली आहे. या सगळ्यांनी आपल्या अलौकिक कार्याने जनसामान्यांच्या मनात कायमचे आदराचे स्थान निर्माण केले आहे. सर्वसामान्य जनतेच्या हृदयात व मनात या सर्वांची जी आदर्श व प्रेरणा देणारी ओळख निर्माण झाली आहे ती कधीच पुसली जाणार नाही. चांगली ओळख निर्माण करण्यासाठी चांगले कार्य करायचे असते, चांगले वागायचे असते, चांगले बोलायचे असते. वाईट कर्मांचा आणि वाईट वर्तनांचा चारित्र्याला डाग लागणार नाही याची काळजी घेतली पाहिजे.

दैनंदिन जीवनात आपल्या हाताने एखादे दुष्कृत्य होणार नाही याची कटाक्षाने खबरदारी घेतली पाहिजे.

सार्वजनिक ठिकाणी चारचौघांत वावरणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला, एखाद्या सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमात जाणाऱ्या लोकांना वेगवेगळ्या विशेषणांनी ओळखले जाते. व्यासपिठावर विराजमान असलेल्या मान्यवरांना, सत्कार होणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना वेगवेगळ्या ओळखीने ओळखले जाते. कार्यक्रमाला उपस्थित लोक वेगवेगळ्या समाजाचे प्रतिनिधित्व करतात. त्यापैकी कोणी भ्रष्टाचारी, व्याभिचारी, संपत्ती व पैशाचे लोभी असतात. कोणी अतिशय रागीट, संतापी व माणूसघाणे असतात.

फक्त स्वतःचा स्वार्थ कसा साधला जाईल, समाजात आपलाच दबदबा कसा निर्माण होईल यासाठी वाट्टेल त्या थराला जाणारे असतात. अशा विचित्र स्वभावाच्या व्यक्तींना तोंडावर सगळे चांगले म्हणतात परंतु त्यांच्या पश्चात त्यांचे सगळे खानदान काढले जाते, त्यांना वाट्टेल ती नाव ठेवले जातात.

सध्याच्या काळात प्रत्येकाची ओळख बदलली आहे. लोक फार विचित्र वागत आहेत, वाईट कर्मांत गुंतले आहेत. पुरोगामी विचारांच्या महाराष्ट्रात भोंदूगिरी वाढली आहे.



अगदी सुशिक्षित लोकसुद्धा भोंदू बाबांच्या जाळ्यात अडकले आहेत. विज्ञान आणि तंत्रज्ञानाची कास धरायची सोडून लोक अंधश्रद्धा व भोंदू बाबांच्या वाईट मार्गाला लागत आहेत. अशा लोकांमुळे शिक्षणाचे महत्त्व कमी होत आहे.अशा लोकांनी स्वतःची वाईट व ओंगळवाणी ओळख निर्माण केली आहे. ही ओळख त्यांची बदनामी करत आहे.

वेगवेगळ्या क्षेत्रांत नोकरी करणाऱ्या लोकांना आळशी, कामचुकार, निष्क्रिय, अप्रामाणिक व लेटलतीफ अशा प्रकारे ओळखले जात आहे. ही ओळख व्यक्तीला कमी लेखणारी असते.

फार थोड्या नोकरदारांना चांगले, प्रामाणिक, कार्यतत्पर व कर्तृत्ववान म्हणून ओळखले जाते.ही ओळख व्यक्तीचा मान सन्मान वाढवणारी असते. बऱ्याच शाळेतील काही शिक्षक अतिशय कर्तृत्ववान असतात व कर्तव्याला प्राधान्य देतात. असे शिक्षक अध्यापनात खंड पडणार नाही याची कटाक्षाने काळजी घेतात.परंतु, बहुतांश शिक्षक सेवानिवृत्ती जवळ आली की वारंवार रजेवर जातात, शाळेत उपस्थित असले तरीही वर्गात जात नाहीत, अध्यापन करत नाहीत. फक्त नोकरीचे दिवस मोजत राहतात. यालाही अपवाद काही शिक्षक असतात. शेवटच्या दिवसांपर्यंत ते प्रामाणिकपणे अध्यापन करतात. विद्यार्थ्यांना ज्ञान व संस्कार देण्यात थोडीही कुचराई करीत नाहीत. अशा शिक्षकांचे कौतुक करावे तेवढे थोडेच असते.

व्यक्तीची ओळख फार महत्त्वाची असते.चांगली ओळख आयुष्याची शिदोरी असते.हे लक्षात घेऊन स्वतःची चांगली ओळख निर्माण करा. त्यासाठी दुर्गुणांचा त्याग करा, वाईट विचारांना जवळ फिरकू देऊ नका.तथागत गौतम बुद्धांनी सांगितलेल्या सम्यक जीवन मार्गाचे आणि त्यांच्या मौलिक विचारांचे अनुकरण केल्यास व्यक्तीची चांगली ओळख बनायला वेळ लागत नाही.

**– बबन दामोदर गुळवे**
**उमरगा कोर्ट ता.अहमदपूर**
**जि.लातूर मो.९७३०९३९७३२**

## मुर्खत्व..

कधीही बनवा मुर्ख
एक एप्रिल कशाला
अंधभक्त संपूर्णतय:
हत्ती म्हणा सशाला

आम्हीश्रोते भाडोत्री
पैसा टाळी हशाला
एक चपटी रात्रीला
गरमी मिळे घशाला

शुभ्र वेशात डॉक्टर्स
काळिमा बा पेशाला
तारखा घेतो वकील
जागा काळे वेशाला

घाबरून सोडे टंचाई
सिलेंडर घेई उशाला
पूर्णकमाई गमावतो
स्वस्तवाटे मधुशाला

मोठमोठे उद्योग पति
सहज फसवे देशाला
आवाज उठवे पागल
कारणबनतो द्वेषाला

एकावर कैकफुक्कट
बळी पडे आमिषाला
स्वस्तबोले महाग घेई
रोजचं चाट खिशाला

शिकविते परिस्थिती
अनुभव खरी प्रशाला
मुर्खत्वात शहाणपणा
मुळी न वाटे ओशाळा

**– हेमंत मुसरीफ, पुणे.**
**९७३०३०६९९६**

# माकडाच्या हाती कोलीत...!!




माकडाच्या हाती कोलीत, अशी मराठीत एक म्हण आहे, याचा अर्थ माकड हा प्राणी मुळात अतिशय अस्वस्थ असतो. तो सतत काही ना काही चाळे करत असतो. त्यामुळे इतरांना त्याचा उपद्रव होत असतो. या उपद्रवामुळे इतरांना त्रास होतो, पण त्या माकडाला मात्र त्याचे काही वाटत नाही, उलट, इतरांना होत असलेला त्रास पाहून त्याला मजा वाटते, त्यामुळे तो अधिक चाळे करू लागतो. त्याला इतरांनी कितीही रोखण्याचा प्रयत्न केला तरी ते काही थांबत नाही. अशा माकडाच्या हातात एखादे कोलीत म्हणजे जळणारे लाकूड सापडले तर ते माकड जिकडे तिकडे आग लावत सुटते. आग लागल्यामुळे मोठे नुकसान होत आहे, याचे त्याला भान नसते. इतर लोक होरपळत आहेत, याची त्याला गंमत वाटत असते. इतकेच काय पण त्या आगीत इतरांसोबत आपणही होरपळले जाणार आहोत, इतके समजण्याइतकी त्याला बुद्धीही नसते. त्यामुळे त्याला कसे आवरावे असा प्रश्न लोकांना पडतो. या माकडाची भूमिका सध्या अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे पार पाडत आहेत. इस्त्रायल आणि आखातातील काही देशांमध्ये जे युद्ध सुरू आहे, त्यात ट्रम्प यांनी अमेरिकेला इस्त्रायलच्या बाजूने उतरवले. आखातात इराण हा इस्त्रायलविरोधात लढणारा प्रबळ देश आहे. इराणने अणूबॉम्ब विकसित केला आहे, अशी माहिती आहे. त्यामुळे उद्या युद्धाची तीव्रता वाढली तर आपल्यावर त्याचा वापर केला जाऊ शकतो, त्यामुळे इस्त्रायलला त्याची भीती वाटते.

इराणचे सर्वेसर्वा अयातुल्ला अली खामेनी यांना ठार केल्यावर इराण शरण येईल, असे डोनाल्ड ट्रम्प आणि इस्त्रायलचे पंतप्रधान नेतान्याहू यांना वाटत होते, पण तसे काही होताना दिसत नाही. आता या युद्धाला महिना झाला आहे. युद्ध सुरू असल्यामुळे केवळ भारतातच नव्हे तर जगातील विविध देशांमध्ये इंधनाचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. इंधन नसल्यामुळे त्याचा परिणाम फक्त रस्त्यावर धावणाऱ्या गाड्यांवर नव्हे तर अन्न शिजवण्यास लागणारा गॅसही मिळणे अवघड झाले आहे. त्याचे कारण इराणला लागून असलेल्या होर्मुझ सामुद्रधुनीतून होणाऱ्या इंधन वाहतुकीवर इराणने बंदी घातली आहे. अशा प्रकारे त्यांनी जगभरातील विविध देशांमध्ये जाणारा इंधन पुरवठा बंद केला आहे. भारताला त्याचा जास्त फटका बसत आहे, कारण भारत हा इंधनासाठी बहुतांशी आखाती देशांवर अवलंबून आहे. याचसोबत इस्त्रायलला अमेरिकेचा पाठिंबा असल्यामुळे आखाती देशांमध्ये होणारे होणारे हल्ले ते थांबवायला तयार नाहीत. उलट, इस्त्रायलचे पंतप्रधान नेत्यान्याहू जगातील देशांना आपल्याला साथ देऊन इराणला नेस्तनाबूत करण्याचे आवाहन करत आहेत, पण त्यांना कुणी प्रतिसाद देत नाही. इराणच्या राणच्या विरोधात अमेरिका आपल्या मित्रराष्ट्रांना खेचण्याचा आटोकाट प्रयत्न करत आहे, पण त्याला कुणी प्रतिसाद देत नाही. कारण या युद्धात जगभरातील अनेक देशांची इंधनकोंडी तर झालेली आहेच, पण या युद्धामुळे आखाती देशांमध्ये आणि इस्त्रायलमध्ये मोठ्या प्रमाणात माणसे मारली जात आहेत, मालमत्तेचे मोठे नुकसान होत आहे. घरे, इमारती उद्ध्वस्त होत आहेत, पायाभूत सुविधा नष्ट होत आहेत. त्यामुळे प्रचंड नरसंहार करणारे हे युद्ध थांबावे, असे जगभरातील अनेक देशांसोबत अमेरिकी लोकांनाही वाटत आहे. कारण आता जगभरातील लोक अमेरिकी नागरिकांनाही दोष लावू लागले आहेत. कारण तुमचा अध्यक्ष जगावर युद्ध लादून अनेकांचे जगणे मुश्किल करत आहे, असे आरोप समाजमाध्यमांवर होत आहेत.

ट्रम्प यांनी युद्ध थांबवावे, हल्ले करू नयेत, यासाठी अमेरिकेच्या विविध राज्यांसह युरोपमधील काही देशांमधील लाखो लोक शनिवारी रस्त्यावर आले होते. 'नो किंग्ज' निदर्शनामध्ये ते सहभागी झाले होते. ट्रम्प यांच्याविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. अमेरिकेतील मिनीसोटा, न्यूयॉर्क, वॉशिंग्टन डीसी, डल्लास, फिलाडेल्फिया, लॉसएंजेलिस, सिएटल तसेच लंडन, पॅरिस आणि रोम इथेही लोक मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते. जगभरातून ट्रम्प यांच्या यांच्या युद्धखोर धोरणामुळे लोकांचा रोष वाढत आहे. या अगोदर यांनी व्हिनिझुएलाच्या अध्यक्षांना उचलून आणले. आता इराणवर हल्ले सुरू आहेत. यानंतर क्युबाचा नंबर आहे, असे ते सांगत आहेत. ट्रम्प यांची ही मनमानी लोकांना आता नकोशी वाटू लागली आहे. त्यामुळे जगभरातील लोकांचा ट्रम्प यांच्यासोबतच अमेरिकेतील नागरिकांविरोधात रोष वाढत आहे. कारण अमेरिका ही अटलांटिक महासागराच्या पलीकडे सुरक्षित आहे, तर दुसऱ्या बाजूला असलेल्या जगातील देशांना या आखाती युद्धाच्या प्रचंड झळा बसत आहेत. भारतातील सुमारे १ कोटी लोक आखातातील विविध देशांमध्ये काम करत आहेत. ट्रम्प यांनी वाढीव आयात कराच्या माध्यमातून तसेच भारतीय नागरिकांना भारतात परत पाठविण्याचा पवित्रा घेतल्यामुळे भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ट्रम्प यांच्याविरोधात फार आक्रमक भाषेचा अवलंब करू शकत नाहीत. ट्रम्प यांनी इस्त्रायला मदत देणे थांबवले तर युद्धांची तीव्रता कमी होईल. ट्रम्प यांना आवरण्यासाठी केवळ अमेरिका आणि युरोप नव्हे तर संपूर्ण जगाने रस्त्यावर उतरण्याची गरज आहे. कारण या युद्धात जे तेलसाठे उद्ध्वस्त होत आहेत, त्यामुळे अख्या जगाचे वांदे होणार आहेत. अमेरिकी नागरिकांनी ट्रम्प यांना निवडून देण्याची एकदा नव्हे तर दोनदा दोनदा चूक चूक केली के आहे, त्याचे परिणाम जगाला भोगावे लागत आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायलयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात

### न.मु.म.पा. मुख्यालयात पार्किंगचा गोंधळ; सुरक्षेबाबत ही गंभीर प्रश्न



**अक्षराज : विनोद धुरंधर**

**दि.३१, बेलापूर (नवी मुंबई) :** नवी मुंबई महानगरपालिकेच्या मुख्यालयात सध्या पार्किंग व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र पाहायला मिळत आहे. चारचाकी वाहनांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे बेसमेंटपासून ते मुख्यालयाच्या आवारापर्यंत सर्वत्र वाहनांची गर्दी झाली आहे. परिणामी, पार्किंग व्यवस्था कोलमडली असून सुरक्षेबाबत ही गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. मुख्यालयाच्या बेसमेंटमध्ये पार्किंग पूर्ण भरलेले असते. एवढेच नव्हे तर बेसमेंटमध्ये जाणाऱ्या वळणावर तसेच तळमजल्यावरील प्रवेशद्वाराजवळही वाहने उभी केली जात आहेत. मुख्यालयाच्या बाहेरील परिसरातही वाहनांची मोठी गर्दी दिसून येते. या परिस्थितीमुळे काही वेळा नगरसेवकांनाही स्वतःच्या वाहनांसाठी जागा मिळत नसल्याचे समोर आले आहे.या वाढत्या समस्येकडे पालिका आयुक्त, उप-आयुक्त तसेच अन्य प्रशासकीय अधिकाऱ्यांकडून दुर्लक्ष होत असल्याचे दिसते. या समस्येवर अद्याप ठोस उपाययोजना करण्यात आलेली नाही, अशी नाराजी व्यक्त होत आहे. दरम्यान, पार्किंग व्यवस्थेतील सुधारणा करण्यासाठी काही उपाय सुचवण्यात आले आहेत. बेसमेंटमध्ये फक्त नगरसेवक आणि उच्चपदस्थ अधिकाऱ्यांची वाहने ठेवावीत, तर माजी नगरसेवक व ठेकेदारांसाठी स्वतंत्र पार्किंगची व्यवस्था करावी. कर्मचाऱ्यांसाठी बेसमेंट बाहेर परिसरात स्टॅक पार्किंग उभारण्याची गरज व्यक्त करण्यात येत आहे. तसेच बाहेरील वाहनांना पूर्वपरवानगीशिवाय प्रवेश न देण्याची व्यवस्था केल्यास परिस्थिती नियंत्रणात येऊ शकते.यासोबतच, मुख्यालयात वाढत्या वाहनांमुळे सुरक्षेवर ही प्रश्न चिन्ह निर्माण झाले आहे. सध्या सुरक्षा यंत्रणा निष्क्रिय असल्याचे चित्र असून 'आओ जावो, घर तुम्हारा' अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडल्यानंतरच सुरक्षा कडक करणे योग्य नसल्याची भावना व्यक्त होत आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून पार्किंग आणि सुरक्षा व्यवस्थेत सुधारणा करण्याची गरज आहे या संदर्भात असे जुईनगर येथील समाजसेवक शीधर मढवी यांनी आमच्या वार्ताहर कळविले आहे.

### बसमधून डिझेल चोरणाऱ्या चोरटयाला पकडणाऱ्या चालक व वाहकाचा दापोली आगारात सत्कार



**अक्षराज : कृष्णा शावणपाटील**

**दि. ३० दापोली (रत्नागिरी) :** दापोली भडवळे बस घेऊन भडवळे येथे वस्तीला गेले असता या बसमधून डिझेल चोरणाऱ्या चोरटयाला रंगेहात पकडण्यात यश मिळाल्याबद्दल दापोली आगाराचे चालक व वाहक यांचा सत्कार दापोली आगारात करण्यात आला. दापोली आगाराचे चालक संतोष कांदेकर हे आपल्या ताब्यातील बस क्रमांक एमएच २० बीएल १५३५ ही घेऊन भडवळे येथे वस्तीला गेले होते. गेले काही महिने भडवळे येथे वस्तीच्या बसमधून डिझेल चोरीला जाण्याचा प्रकार घडला होता. यावेळी वारंवार एकच चारचाकी ही या परिसरात फिरत असल्याचे चालक कांदेकर यांच्या लक्षात आले होते. त्यानुसार त्यांनी आपले सहकारी वाहक निवृत्ती पवार व खेड आगाराचे चालक श्री.डोंगरे व वाहक यांच्या मदतीने सापळा रचला यामध्ये श्री.कांदेकर यांनी भडवळे शेरी भोईवाडी येथील ग्रामस्थ बाळकृष्ण सनवारे, दत्ताराम मिंडे, संदीप जुवळे, नारायण सनवारे, सुधाकर पावसकर, शांताराम पावसकर, योगेश मिंडे यांची मदत घेतली. संशयित चोरटा श्री.रुके हा दापोली आगाराच्या बसमधून डिझेल चोरत असल्याचे बसमध्ये बसलेल्या चालक श्री. कांदेकर यांच्या लक्षात येताच त्यांनी ग्रामस्थांना तसेच आपल्या सहकाऱ्यांना जागृत केले व त्यांच्या मदतीने संशयिताला वाहनासह रंगेहात पकडले. यावेळी दापोली आगाराचे चालक व फणसूचे रहिवाशी चेतन मिरगल व शंकर गायकर हेही घटनास्थळी तातडीने दाखल झाले.चालकाने प्रसंगवधान दाखवून डिझेल चोरीचा प्रकार उघड केल्याबद्दल दापोली आगारात शिवसेनेचे विधानसभा क्षेत्रप्रमुख व जि.प. सदस्य किशोरभाई देसाई, आगार व्यवस्थापक राजेंद्र उबाळे, वाहतुक निरीक्षक हर्षलजी नाफडे यांच्या उपस्थितीत चालक संतोष कांदेकर व वाहक निवृत्ती पवार यांचा सत्कार करण्यात आला.

### गोवरी जि.प. शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षपदी मार्कडी लांडे तर उपाध्यक्षपदी सीमा जुनघरी यांची निवड





**अक्षराज : चंद्रकांत भूयार**

**दि.३१, राजुरा :** तालुक्यातील गोवरी येथील जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षपदी मार्कडी लांडे यांची तर उपाध्यक्षपदी सीमा जुनघरी, सदस्यांमध्ये सुनील मादनेलवार, विनोद परसूटकर, प्रशांत उताणे , सोनाली जुनघरी,कोमल बल्की,नीलिमा ईखारे, साक्षी वाघमारे, शर्मिला कास्वटे यांची बहुमताने निवड करण्यात आली आहे. शालेय कामकाजात पारदर्शकता यावी आणि विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक प्रगतीला गती मिळावी, या उद्देशाने नवीन समितीची निवड प्रक्रिया नुकतीच गोवरी येथील जिल्हा परिषद प्राथ.शाळेत पार पडली. या सभेला जि.प.शाळेचे मुख्याध्यापक देवराव दिवसे, शिक्षक रामदास गव्हारे, अल्का गेडाम, सुनीता जानवे,गंगा चव्हाण यांचेसह प्रतिष्ठित नागरिक व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या मुख्य अभियंतापदी विवेक रोकडे रुजू



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.३१, नागपूर :** सावनेर तालुक्यातील खापरखेडा औष्णिक वीज केंद्राचे मुख्य अभियंता गिरीश कुमारवार यांची मुंबई येथे मुख्य कार्यालयात अतिरिक्त कार्यकारी संचालक (संचलन-१)पदी पदोन्नती झाल्याने त्यांच्या रिक्त जागी कोराडी प्रकल्पाचे विवेक रोकडे यांची खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्राच्या मुख्य अभियंता पदी निवड करण्यात आली. विवेक रोकडे यांनी खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या मुख्य अभियंता पदाचा ३१ मार्च मंगळवार रोजी सौदामिनी येथील कार्यालयात पदभार सांभाळला. यावेळी उपमुख्य अभियंता नितीन रोकडे आणि इतर अधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते. नव्याने मुख्य अभियंता पदी रुजू झालेले विवेक रोकडे यांनी याआधी खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या राख हाताळणी विभागात कनिष्ठ अभियंता म्हणून कार्य केलेले आहे.

## पारनेर ग्रामीण पतसंस्थेला ५ कोटी ३२ लाख रुपयांचा नफा -आ.दाते

**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर ग्रामीण पतसंस्थेला सन २०२५ – २०२६ या आर्थिक वर्षात रुपये ५ कोटी ३२ लाख रुपयांचा ढोबळ नफा झाला आहे अशी माहिती संस्थेचे संस्थापक चेअरमन तथा आमदार काशिनाथ दाते यांनी दिली.

संस्थेच्या ठेवी मार्च २०२६ अखेर २५१ कोटी ८२ लाख रुपयांच्या ठेवी आहेत. संस्थेचे खेळते भांडवल २९५ कोटी ५२ लाख असुन वसूल भाग भांडवल ६ कोटी ५४ लाख, राखीव व इतर निधी २९ कोटी ८३ लाख आहे. संस्थेचे कर्ज वाटप १७५ कोटी २९ लाख असून बँक शिल्लक व गुंतवणूक रुपये १०६ कोटी ९९ लाख आहे. संस्थेची वार्षिक उलाढाल रुपये २४८० कोटींची झालेली आहे.



संस्थेने २३ वर्षाच्या कालावधीत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे (नवी मुंबई) खडकवाडी, आळेफाटा, सुपा व शिरूर येथे स्वमालकीच्या प्रशस्त व अध्यावत इमारती आहेत. पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, बेलवंडी फाटा, जामगाव, नारायणगव्हाण, आळेफाटा ता. जुन्नर, सुपा, कामोठे (नवी मुंबई), वनकुटे, अहिल्यानगर, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा कार्यरत आहेत. संस्थेचे कार्यक्षेत्र अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई आहे.

संस्थेमार्फत पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, जामगाव, ढवळपुरी व बेलवंडी फाटा येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करण्यात आलेली आहे. संस्थेच्या अद्यावत कोर बँकिंग, मोबाईल बँकिंग, एस एम एस सुविधांमुळे ग्राहकांना सर्व माहिती तात्काळ मिळत आहे.

तसेच संस्थेच्या सर्व शाखांमध्ये महाराष्ट्र राज्य वीज वितरक कंपनीचे अधिकृत वीज बिल भरणा केंद्र, आर. टी.जी.एस व एन.ई.एफ.टी सुविधा सुरू करण्यात आल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात यांनी सांगितले.

> संस्थेने २३ वर्षाच्या कालावधीत सभासदांच्या विश्वासावर प्रगती केलेली असून, सभासदांना घर बांधणी, व्यवसाय, स्थावर मालमत्ता खरेदीसाठी, वाहन खरेदी तसेच गोरगरीब गरजू घटक, सुशिक्षित बेरोजगार, शेतकरी, लघुउद्योग, होतकरू कामगारांना बचत गटाच्या माध्यमातून आर्थिक प्रगती करता यावी. यासाठी पतसंस्थेच्या माध्यमातून कर्ज वितरण करून आर्थिक विकास करण्याचा प्रयत्न केला आहे.
> - सुरेश बोरुडे (व्हा.चेअरमन पारनेर ग्रामीण पतसंस्था पारनेर)

## रत्नागिरीत राष्ट्रीय स्तरावरील ब्लॅक बेल्ट परीक्षेमध्ये, दूर्वा, अनया, आहाना यांची उल्लेखनीय कामगिरी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, रत्नागिरी :** तायक्वांदो फेडरेशन ऑफ इंडियाच्या मान्यतेने आणि तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रच्या संयुक्त विद्यमाने, रत्नागिरी स्पोर्ट् मार्फत नुकताच 'ब्लॅक बेल्ट दान प्रमोशन टेस्ट'चे आयोजन करण्यात आले होते. मारुती मंदिर येथील छत्रपती शिवाजी महाराज स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सच्या बॅडमिंटन हॉलमध्ये ही परीक्षा पार पडणात आली.

ही परीक्षा अखिल भारतीय (ऑल इंडिया) स्तरावर आयोजित करण्यात आली असून, यासाठी संपूर्ण भारतातून तायक्वांदो ५०० हून खेळाडू रत्नागिरीत दाखल झाले आहेत. खेळाडूंच्या तांत्रिक कौशल्याची आणि शारीरिक क्षमतेची कसून चाचणी या परीक्षेत घेण्यात आली आहे. या अत्यंत महत्त्वाच्या परीक्षेसाठी रत्नागिरीतील प्रतिष्ठीत गणराज तायक्वांदो क्लब (साळवी स्टॉप) चे एकूण ३ खेळाडू पात्र झाले होते. प्रथम दानसाठी उल्लेखनीय कामगिरी केली दुर्वा मंदार हातीसकर, अनया अभिज्ञ वणजू, अहाना आशिष रसाळ, यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे, यांना महिला प्रमुख प्रशिक्षक आराध्या प्रशांत मकवाना यांचे मार्गदर्शन लाभत आहे.





या खेळाडूंच्या यशाबद्दल तायक्वांदो असोसिएशन ऑफ महाराष्ट्रचे अध्यक्ष डॉ.अविनाश बारगजे, महासचिव मिलिंद पठारे, कोषाध्यक्ष व्यंकटेश्वर कररा आणि सचिव सुभाष पाटील, शिवछत्रपती पुरस्कार विजेते प्रवीण बोरसे, धुलीछंद मेश्राम, जिल्हा सचिव लक्ष्मण करा, उपाध्यक्ष विश्वास लोखंडे आणि कोषाध्यक्ष शशांक घडशी यांनी खेळाडूंना शुभेच्छा दिल्या आहेत.

रत्नागिरी जिल्हा क्रीडा अधिकारी विजय शिंदे गणराज क्लबचे अध्यक्ष अँड पूजा प्रसाद शेट्ये, रत्नागिरीच्या नगराध्यक्षा शिल्पाताई प्रशांत सुर्वे, नगरसेवक पुजाताई दिपक पवार, नगरसेवक राजन शेट्ये, नगरसेवक सौरभ मलुष्टे, के.एस.पोवार क्लब उपाध्यक्षसाक्षी मयेकर, सदस्य परेश मोडूळा, स्नेहा मोरे, शलाका जावकर, सिनियर खेळाडूंनीसह पालक वर्ग सर्व नगरसेवक आर्दीनी उल्लेखनीय कामगिरी केलेल्या खेळाडूना शुभेच्छा दिल्या.

## निळजे ग्रामस्थांचे रेल्वे प्रशासनाविरुद्ध बेमुदत धरणे आंदोलन

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३१, निळजे (कल्याण, ठाणे) :** रेल्वे क्रॉसिंगसाठी जुन्या रेल्वे फाटकापासून ये-जा करण्याकरिता नवीन मार्ग उपलब्ध करून द्यावा. या मागणीसाठी निळजे ग्रामस्थांनी रेल्वे प्रशासनाविरुद्ध बेमुदत धरणे आंदोलन सुरू केले आहे. गेल्या ५ ते ६ वर्षांपासून हा प्रश्न प्रलंबित असून, रेल्वे प्रशासनाकडून कोणताही ठोस निर्णय घेतला जात नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. सध्या उपलब्ध असलेला पर्यायी मार्ग गावापासून एक ते दीड किलोमीटर अंतरावर असल्यामुळे अबालवृद्ध, महिला तसेच शाळकरी विद्यार्थ्यांना मोठ्या गैरसोयींचा सामना करावा लागत आहे. विशेषतः पावसाळ्यात या मार्गावर पाणी साचत असल्याने वाहतूक आणखी कठीण होते. पूर्वी रेल्वे फाटकाचा मार्ग स्थानिकांसाठी सोयीचा होता. मात्र तो बंद करून दूसरा मार्ग उपलब्ध केल्याने



ग्रामस्थांची मोठी अडचण निर्माण झाली आहे. या संदर्भात निळजे ग्रामस्थांनी अनेक वेळा रेल्वे प्रशासनाला पत्रव्यवहार केला. निवेदने दिली तसेच डीआरएम यांची भेटही घेतली; मात्र अद्याप कोणतीही कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे अखेर २८ मार्चपासून ग्रामस्थांनी बेमुदत आंदोलनाचा पवित्रा घेतला आहे. या आंदोलनासाठी विविध राजकीय नेत्यांना आमंत्रित करण्यात आले होते. कल्याण ग्रामीणचे आमदार राजेश मोरे यांनी आंदोलन स्थळी उपस्थित राहून ग्रामस्थांशी संवाद साधला. त्यांनी सांगितले की, खासदार डॉ.श्रीकांत शिंदे यांच्याशी चर्चा करून रेल्वे प्रशासनासोबत बैठक घेऊन या प्रश्नावर लवकर तोडगा काढण्यासाठी पाठपुरावा केला जाईल.आमदार राजेश मोरे यांनी आंदोलन करणाऱ्यांची भेट घेतली तरी हे आंदोलन सध्या सुरूच राहणार आहे जोपर्यंत ग्रामस्थांना न्याय मिळत नाही. तोपर्यंत हे आंदोलन सुरूच राहणार आहे. या आंदोलनात प्रकाश पाटील, डॉ.रमेश पाटील, तुकाराम पाटील, शरद पाटील, मुकुंद पाटील, बळीराम पाटील, पंढरीनाथ पाटील, रवींद्र पाटील, गजानन पाटील, जनार्दन पाटील, गिरीधर पाटील, गीता पाटील, रजनी पाटील यांच्यासह अनेक पदाधिकारी आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

## शिळ-दिवा रस्त्याची दुरवस्था; प्रशासनाला आवाहन





**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.३१, शिळगांव (ठाणे) :** शिळ-दिवा रस्त्यावर कासवाच्या गतीने काँक्रिटीकरण करण्याचे काम चालू आहे, पण दोन महिन्यांनतर पावसाला सुरवात होणार आहे. प्रशासनाने या रस्त्याची दुरुस्ती करून खड्डे बुजवले नाहीत, त्यामुळे वाहन चालकांना आणि प्रवाशांना त्रास सहन करावा लागत आहे.

**समस्या :**

- वाहन चालकांचा मेंटेनन्सचा खर्च वाढत आहे.
- वाहन चालकांच्या आणि प्रवाशांच्या मणक्याला, कमरेला, हाताला जोरात हिसका बसत आहे.
- लहान-मोठे अपघात होत आहेत.
- रस्त्यावर दिवाबत्तीची सोय नसल्यामुळे रात्री अंधार असतो, त्यामुळे वाहन चालकांना खड्डे दिसत नाहीत.

**नगरसेवक आणि अधिकारी अनभिज्ञ?**



दररोज या मार्गावरून ठाणे महानगरपालिकेचे अधिकारी जात असतात तसेच ११ नगरसेवक या मार्गातून प्रवास करत असतात. त्यांच्या डोळ्यातून रस्त्याची झालेली दुरवस्था पाहत असतात, पण त्यांना काही दुरुस्ती करण्यासाठी मूर्त सापडत नाही.

**आवाहन :**

ठाणे जिल्हा ऑटो रिक्षा टॅक्सी चालक-मालक संघटनेचे उपाध्यक्ष विनोद वास्कर यांनी प्रशासनाला आवाहन केले आहे की, आता तरी प्रशासन जागे होऊन या रस्त्याची दुरुस्ती करावी.

अक्षराज



# पनवेल महानगरपालिकेचे ४,८५३ कोटीच्या अंदाजित जमा व खर्चाचे विवरण पत्र स्थायी समितीस सादर

**अक्षराज : जे. के. पोळ**

**दि.३१, पनवेल :** पनवेल महानगरपालिकेचे सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाचे अंदाजित जमा व खर्चाचे विविरण पत्र आज स्थायी समितीच्या विशेष सभेमध्ये आयुक्त मंगेश चितळे यांनी स्थायी समिती सभापती बबन मुकादम यांच्याकडे सादर केले. या विवरणपत्रात शहराच्या सर्वांगीण विकासावर भर देत पायाभूत सुविधा विकास, पाणीपुरवठा, आरोग्य सेवा, स्वच्छता, शिक्षण तसेच नागरिकांना दर्जेदार नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे.

यावेळी अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, अतिरिक्त आयुक्त महेशकुमार मघमाळे, मुख्य वित्त व लेखा अधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, महापालिका सचिव नानासाहेब कामठे, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे, स्थायी समितीचे सर्व सदस्य, उपमुख्यलेखा परीक्षक संदिप खुरपे उपस्थित होते.

> महापालिकेने सादर केलेले हे अंदाजित जमा व खर्चाचे विवरण पत्र शहराच्या पायाभूत सुविधा, पाणीपुरवठा, आरोग्य, शिक्षण आणि पर्यावरण यांचा समतोल साधत विकासाला चालना देणारे ठरणार आहे.
>
> **– आयुक्त मंगेश चितळे, पनवेल महानगरपालिका**



सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकानूसार जमा खर्चाच्या बाबींचा तपशील पहाता एकुण जमा रूपये ४ हजार ८५३ कोटी ९० लाख (आरंभी शिलकी सह) इतके असून एकुण खर्च रूपये ४ हजार ८५३ कोटी ८० लाख इतका आहे. अखेर शिल्लक रूपये १० लाख इतकी आहे.

खर्चाच्या बाबतीत आस्थापना खर्चासाठी १९३ कोटींची तरतूद करण्यात आली असून, नविन प्रशासकीय इमारतीसाठी तब्बल २०० कोटी राखीव ठेवण्यात आले आहेत. शहरातील होल्डिंग पॉन्डसाठी ६० कोटी, तसेच बहुउद्देशीय समाजमंदिर बांधकामासाठी ४० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. नागरिकांच्या दैनंदिन गरजांचा विचार करत दैनंदिन बाजार विकसित करण्यासाठी ६४ कोटी, गावठाण परिसरातील पायाभूत सुविधांसाठी ६१ कोटी, तसेच घनकचरा संकलन,वाहतूक व मनुष्यबळ व इतर अनुषंगिक बाबी यांच्यासाठी ३१८ कोटींची मोठी तरतूद करण्यात आली आहे. वैद्यकीय व आरोग्य सेवांसाठी १९४ कोटी, अग्निशमन व सुरक्षा व्यवस्थेसाठी ८३ कोटी, तसेच रस्त्यांचे काँक्रीटीकरण व डांबरीकरणासाठी ३५८ कोटींचा निधी प्रस्तावित आहे. शिलार धरण प्रकल्पासाठी १५० कोटींची तरतूद करण्यात आली आहे. मलनिस्सारण व पाणी पुर्नवापर प्रक्रिया केंद्र व इतर कामांसाठी ११५ कोटींची तरतूद, विद्युत व्यवस्थेसाठी १४७ कोटी, भुयारी गटार व मलनिस्सारणासाठी १६४ कोटी , शिक्षण क्षेत्रात प्राथमिक शिक्षणासाठी १७४ कोटी, माहिती व तंत्रज्ञानासाठी १४३ कोटी, तसेच शासकीय अमृत योजनेअंतर्गत विविध विकासकामांसाठी ११७ कोटींचा निधी राखीव ठेवण्यात आला आहे. याशिवाय भूसंपादन, सार्वजनिक सुविधा आणि नगररचना यासाठीही मोठ्या प्रमाणात निधी प्रस्तावित आहे.

**समतोल शाश्वत विकासासाठी वाढीव तरतूद...**


मागील वर्षीच्या अंदाजपत्रकापेक्षा या वर्षी काही विभागांच्या आर्थिक तरतूदींमध्ये वाढीव तरतूद करण्यात आली आहे. यामध्ये दिव्यांग कल्याण(१५ कोटी), प्राथमिक शिक्षण (११० कोटी), वैद्यकिय आरोग्य(८९ कोटी) , पाणीपुरवठा व्यवस्था(१४२.५ कोटी) , घन कचरा व्यवस्थापन (२७ कोटी), अग्निशमन व सुरक्षा व्यवस्थापन (३६ कोटी), महिला व बालकल्याण (१० कोटी), समाजविकास व मागासवर्गीय कल्याण(१८कोटी) इतकी मागील वर्षीपेक्षा वाढीव तरतूद करण्यात आली आहे.

# थोडक्यात

## टाकळी ढोकेश्वर येथे आज काळभैरवनाथाचा यात्रोत्सव

### विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**अक्षराज : वसंत रांधवण**




**दि.३१, पारनेर (अहिल्यानगर) :** तालुक्यातील आदर्श गाव टाकळी ढोकेश्वर येथिल ग्रामदैवत श्री काळभैरवनाथ महाराज यात्रा उत्सव आज बुधवार दिनांक १ एप्रिल २०२६ रोजी साजरा होत आहे. दरवर्षी प्रमाणे यंदाही विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती यात्रा कमिटीचे अध्यक्ष संपतराव तराळ व भैरवनाथ मित्र मंडळाच्या वतीने देण्यात आली.

आज सकाळी ६ वाजता काळभैरवनाथ महाराजांच्या मुर्तीला अभिषेक पूजन होईल. सकाळी ९ वाजता भव्य काठी मिरवणूक काढण्यात येणार आहे. सायंकाळी सहा वाजता श्री भैरवनाथ मित्र मंडळ (बांडेमळा) यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. रात्री ८ ते १० वाजता फटाक्यांची आतषबाजी करत वाजतगाजत भव्य छबिना मिरवणूक काढण्यात येणार आहे. त्यानंतर रात्री उशिरा अकरा वाजता जागरण गोंधळाचा कार्यक्रम होईल. परिसरातील भाविकांनी या यात्रा उत्सवात सहभागी होऊन लाभ घ्यावा असे आवाहन श्री भैरवनाथ प्रतिष्ठान बांडेमळा व समस्त ग्रामस्थ टाकळी ढोकेश्वर यात्रा कमिटीने केले आहे.

## माथेरान विकासाला गती देण्यासाठी एकजुटीची गरज

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**



**दि.३१, माथेरान :** निसर्गाच्या सान्निध्यात वसलेले, हिरव्यागार डोंगररांगांनी नटलेले माथेरान हे रायगड जिल्ह्यातील एक अद्वितीय पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध आहे. थंड हवामान, प्रदूषणमुक्त वातावरण आणि घनदाट वनराईमुळे येथे वर्षभर पर्यटकांची मोठी वर्दळ असते. अलीकडे सुरू झालेल्या ई-रिक्षा प्रकल्पामुळे पर्यटकांच्या सोयींमध्ये लक्षणीय वाढ झाली असून स्थानिकांसाठी रोजगाराच्या नव्या संधीही निर्माण झाल्या आहेत.

आजच्या आधुनिक युगात पर्यटनवाढीसाठी बदल स्वीकारणे अपरिहार्य आहे. सुधारित वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, वीज-पाणी सुविधा, तसेच पर्यटकांसाठी आकर्षक उपक्रम यांचा विकास केल्याशिवाय कोणतेही ठिकाण स्पर्धेत टिकू शकत नाही. अशा सुविधा उपलब्ध झाल्यास स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळून गावाचा सर्वांगीण विकास साधता येतो.

तथापि, काही वेळा विविध कारणांमुळे विकासकामांना विरोध होत असल्याचे दिसून येते. अशा विरोधामुळे प्रगतीचा वेग मंदावतो आणि उपलब्ध संधींचा योग्य लाभ घेतला जात नाही. विकास हा केवळ काही व्यक्तींसाठी नसून संपूर्ण गावाच्या उज्ज्वल भवितव्यासाठी अत्यंत महत्त्वाचा असतो. त्यामुळे सर्वांनी सकारात्मक दृष्टीकोन स्वीकारून एकजुटीने काम करणे गरजेचे आहे.

गावाच्या हितासाठी सुरू असलेल्या उपक्रमांना सहकार्य मिळाल्यास माथेरान अधिक आकर्षक आणि आदर्श पर्यटनस्थळ म्हणून विकसित होऊ शकते. एकोप्याने घेतलेले निर्णय आणि सहकार्याची भावना यामुळे भावी पिढ्यांसाठी उज्ज्वल संधी निर्माण होतील, असे मत स्थानिक ज्येष्ठ नागरिक व्यक्त करत आहेत.

# माथेरान पालिकेत सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचा सन्मान ; पीएफ प्रकरणामुळे निर्माण झाला वाद

**अक्षराज : चंद्रकांत सुतार**

**दि.३१, माथेरान :** माथेरान नगरपालिकेत दीर्घकाळ सेवा बजावलेल्या दोन कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवानिवृत्तीच्या निमित्ताने सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. लेखनिक प्रवीण सुर्वे आणि श्रेणी-चार कर्मचारी अनिता चव्हाण यांच्या गौरवासाठी पालिकेच्या बाळासाहेब ठाकरे सभागृहात विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी नगराध्यक्ष चंद्रकांत चौधरी, उपनगराध्यक्ष संतोष शेलार, अधीक्षक सुरेंद्र ठाकूर, मुख्याधिकारी राहुल इंगळे आणि नगरसेवकांच्या उपस्थितीत दोघांनाही शाल, श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

निवृत्ती हा प्रत्येक कर्मचाऱ्याच्या आयुष्यातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. अनेक वर्षांच्या कष्ट, जबाबदाऱ्या आणि सेवेनंतर येणारा हा क्षण अभिमानाचा असतो. मात्र याचवेळी सहकाऱ्यांपासून दूर जाण्याची हुरहूर, कामाच्या आठवणी आणि आयुष्यातील नव्या टप्प्याची सुरुवात यामुळे मनात मिश्र भावना दाटून येतात. सन्मान आणि समाधानासोबतच एक वेगळा भावनिक अनुभव या क्षणी जाणवतो. प्रवीण सुर्वे हे १९९३ ला लिपिक म्हणून माथेरान नगरपालिकेमध्ये कामावर रुजू झाले .सुमारे ३२ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावली. शांत, संयमी आणि कर्तव्यदक्ष स्वभावामुळे त्यांनी सहकारी व नागरिकांमध्ये वेगळे स्थान निर्माण केले. विविध जबाबदाऱ्या सांभाळताना त्यांनी कधीही कामात कसूर केली नाही. निवडणूक प्रक्रियेत बीएलओ म्हणूनही त्यांनी जबाबदारी यशस्वीरीत्या पार पाडली. तर दुसरीकडे, अनिता चव्हाण यांनी सुमारे २२ वर्षे विविध पदांवर काम करत सेवा दिली. प्राथमिक शाळेत परिचारिका म्हणून विद्यार्थ्यांची काळजी घेतल्यानंतर त्यांनी रुग्णालयातही कार्य करत रुग्णसेवा केली. वैयक्तिक अडचणींना सामोरे जात,



पतीच्या निधनानंतर कुटुंबाची जबाबदारी सांभाळत त्यांनी नोकरी सुरू ठेवली, ही बाब विशेष उल्लेखनीय ठरली.

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी दोन्ही कर्मचाऱ्यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या सेवाभावाचे कौतुक केले आणि पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, या कार्यक्रमानंतर एक वादग्रस्त बाब समोर आली. प्रवीण सुर्वे यांना त्यांच्या भविष्य निर्वाह निधी (PF) चा धनादेश देण्यात आला, मात्र अनिता चव्हाण यांना तो देण्यात आला नसल्याने नाराजी व्यक्त झाली. यावर माजी नगरसेवक संतोष लखन यांनी तीव्र प्रतिक्रिया देत, सफाई कर्मचाऱ्यांबाबत भेदभाव होत असल्याचा आरोप केला. या घटनेमुळे पालिका प्रशासनावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून नागरिकांमध्ये चर्चा सुरू झाली आहे. एकीकडे सन्मानाचा सोहळा आणि दुसरीकडे निर्माण झालेला वाद यामुळे या निरोप समारंभाला वेगळीच छटा लाभल्याचे चित्र दिसून आले.

# वडगाव तेजन येथील शेतकऱ्याची एक हेक्टर वरील आंब्याची बाग जळून खाक

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, लोणार :** लोणार तालुक्यातील वडगाव तेजन येथील अतिशय मेहनती शेतकरी सत्यनारायण तेजनकर यांची कृषी विभागाच्या अंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत तीन वर्षांपूर्वी एक हेक्टर फळबाग लागवड अंतर्गत आंबा लागवड केलेली होती.

परंतु दिनांक ३० मार्च २०२६ रोजी सायंकाळी ठीक सहा वाजे दरम्यान सदर शेताच्या शेजारी असलेल्या सदाशिव चौगुले यांच्या शेतातील गव्हाच्या काडाला आग लागल्याने अचानक सुटलेल्या वाऱ्यावावधनाने सदर आग हि आंबा लागवड अंतर्गत असलेल्या गव्हाचे काडाकडे आली.व संपूर्ण आंब्याच्या बागेने काही क्षणात फार भयानक पेट घेतला. सदर परिस्थिती गावातील बऱ्याच गावकऱ्यांच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी सत्यनारायण तेजनकर यांच्या शेताकडे धाव घेऊन आग विझवण्याचा अतोनात प्रयत्न केला. परंतु ही आग एवढी भयानक होती की आग विझवणे शक्य न झाल्यामुळे गावकऱ्यांचे प्रयत्न फेल होऊन काही मिनिटातच सदर आंब्याच्या मळ्याचे होतेचे नव्हते झाले. त्यामध्ये त्या झाडांसाठी फिनोलेक्स कंपनीची विस एम एम ड्रिंचिंग सुद्धा त्या आगीत जळून खाक झाले व स्पिंकलर संच सुद्धा जळून खाक झाल्यामुळे या शेतकऱ्यावर फार मोठा आघात झाला आहे.

अतिशय रात्रंदिवस च्या मेहनती मधून हि बाग डोलताना दिसत होती व अवघ्या काही दिवसांवर या बागेचे आंब्याचे फळ



> मी तीन वर्षांपूर्वी रोजगार हमी योजने अंतर्गत कृषी विभागामार्फत एक हेक्टर आंबा फळबाग लागवड केलेली होती आणि अतिशय मेहनतीने ही आंब्याची बाग फुलविली सुद्धा होती. यावर्षी या बागेतील आंब्याला चांगल्या प्रकारे फळ लागलेली असतानाच माझ्या शेजारील शेतकरी सदाशिव सिताराम चौगुले यांनी त्यांच्या शेतातील गव्हाच्या काडाला ऐन वाऱ्या वावधनाच्या टायमात लावलेल्या आगीमुळे सदर आग ही माझ्या आंब्याच्या मळ्यातील अंतर्गत पीक असणाऱ्या गव्हाच्या काडाला लागली बऱ्याच गावकऱ्यांनी या आगीला विझवण्याचे अतोनात प्रयत्न केले. परंतु ते निष्फळ गेले व काही क्षणात मी रंगविलेल्या स्वप्नांचे व्हत्याचे नव्हते झाले. सदर घटनेमध्ये माझे दहा ते पंधरा लाखाचे नुकसान झाले आहे. तरी प्रशासनाने व शासनाने सदर बाबीकडे गांभीर्यपूर्वक लक्ष देऊन शेतकऱ्यांना वाचविण्याचे दृष्टीने मदत करावी हीच अपेक्षा.
>
> **- सत्यनारायण तेजनकर (शेतकरी)**

सुद्धा खायच्या अवस्थेत असताना सदर आंब्याच्या बागेचे होतेचे नव्हते झाल्यामुळे संपूर्ण गावकऱ्यांमध्ये हळहळ व्यक्त होत आहे.

**अतिवृष्टीनंतर पुन्हा आगीमुळे नुकसान**

या अगोदर अतिवृष्टी व ढगफुटी मुळे शेतकरी सतीश तेजनकर यांच्या आंबेचे बागेचे नुकसान झाले होते. परंतु त्यांनी परत जिद्दीने झालेले नुकसान भरून काढले होते. वारंवार होणाऱ्या नैसर्गिक आपत्तीमुळे शेतकऱ्यांपुढे मोठे संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे सदर शेतकरी सतीश तेजनकर यांच्यावर कर्जाचा भार वाढण्याची भीती व्यक्त केली जात आहे.


त्यामुळे प्रशासनाने ताबडतोब पंचनामा करून शेतकरी सतीश तेजनकर यांना योग्य ती नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच अशा घटनेची पुनरावृत्ती टाळण्यासाठी शेतकऱ्यांना जनजागृती करण्याची गरज व्यक्त होत आहे. निसर्गाच्या सततच्या कोपामुळे शेतकऱ्याचे जीवन अस्थिर होऊन शासनाने अशा पीडित शेतकऱ्याला तात्काळ मदत करणे गरजेचे आहे.

# गॅसमुळे मिरा भाईंदर स्टील उद्योग संकटात कामकाज ठप्प !

**अक्षराज : घनश्याम आंबोकर**

**दि.३१, मीरा-भाईंदर :** भारतातील स्टील भांड्यांचे प्रमुख केंद्र म्हणून ओळखल्या जाणाऱ्या मीरा-भाईंदरमध्ये सध्या गॅस सिलिंडरची गंभीर टंचाई जाणवत आहे. गॅसच्या अनुपलब्धतेमुळे पोलाद उद्योगात काम करणाऱ्या कारागिरांसमोर मोठे संकट निर्माण झाले आहे.

हे कामगार सहसा भाड्याच्या खोल्यांमध्ये किंवा गटांमध्ये राहतात आणि स्वतःचे जेवण स्वतःच बनवतात. मात्र, गॅस सिलिंडरच्या कमतरतेमुळे त्यांना अन्न मिळवण्यात मोठ्या अडचणी येत आहेत. परिणामी, अनेक कामगारांना आपली नोकरी सोडून आपल्या गावी परत जाण्यास भाग पडत आहे.



भाईंदरमध्ये ८,००० हून अधिक पोलाद कारखाने कार्यरत आहेत. यापैकी बहुतेक कारखाने निवासी भागांमध्ये आहेत, ज्यामुळे आगीचा धोका निर्माण होतो. परिणामी, अनेक कारखानदार लाकूड किंवा कोळशावर काम भागवण्याचा प्रयत्न करत आहेत.

या परिस्थितीत, काही मोठ्या कारखान्यांनी आपल्या कामगारांना जेवण देण्यास सुरुवात केली आहे, तर छोटे कारखाने बाहेरून जेवण मागवण्यावर अवलंबून झाले आहेत. यामुळे हॉटेल्स आणि टिफिन सेवांच्या व्यवसायाला चालना मिळाली आहे, परंतु पोलाद उद्योगावरील त्याचा नकारात्मक परिणाम स्पष्टपणे दिसून येत आहे.

ही परिस्थिती पॅकेजिंग साहित्याच्या व्यापाऱ्यांसाठीही चिंतेचा विषय आहे. भाईंदर येथील व्यापारी, सागर पॅकेजिंगचे राजेश शर्मा यांच्या मते, दररोज विकल्या जाणाऱ्या डिस्पोजेबल प्लेट्सच्या संख्येत लक्षणीय वाढ झाली आहे.

# १५ जूनपासून शाळा सुरू करण्याच्या निर्णयावर पालक-शिक्षकांत नाराजी

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.३१, चिमूर :** येणाऱ्या पुढील शैक्षणिक सत्र २०२६-२७ पासून संपूर्ण राज्यासोबतच विदर्भातील प्राथमिक शाळा १५ जूनपासून सुरू करण्याचे निर्देश शिक्षण संचालनालयाने दिले आहेत. या निर्णयामुळे विदर्भातील पालक व शिक्षकांमध्ये नाराजीचे वातावरण पसरले आहे. दरवर्षी विदर्भातील शाळा १ जुलैच्या आसपास सुरु होत असत. मात्र यावर्षी शिक्षण संचालनालयाकडून १५ जून पासून शाळा सुरू करण्याचे आदेश दिल्यामुळे पालक आणि शिक्षकांत नाराजीचे सूर उमटू लागले आहेत.

> तीव्र उष्णता व शाळांमधील अपुऱ्या सुविधा लक्षात घेता १५ जूनपासून शाळा सुरु करण्याचा हा निर्णय विद्यार्थ्यांच्या आरोग्यासाठी घातक ठरू शकतो. उष्णतेच्या बाबतीत चंद्रपूर जिल्हा तर देशात अग्रक्रमी असतो. पूर्वीप्रमाणे १ जुलैच्या आसपास शाळा सुरू कराव्यात अशी रास्त मागणी पालक आणि शिक्षकांची आहे. सरकारने याचा विचार करावा.
>
> **– सुरेश डांगे, विभागीय अध्यक्ष, शिक्षक भारती नागपूर विभाग**

जून महिन्यातही विदर्भातील तापमान ४५ अंश असते. उन्हाच्या झळा या दरम्यान विदर्भाला बसत असतात. अनेक शाळांमधील वीज कनेक्शन बंद असून ग्रामीण शाळांमधील अपुऱ्या सुविधा, पंख्यांची सोय नसणे आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य लक्षात घेता हा निर्णय बदलण्याची मागणी शिक्षक व पालकांकडून होत आहे. १ जुलैच्या जवळपास शाळा सुरु करण्यात याव्या अशी मागणी जोर धरू लागली आहे.